पिपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग कार्यालय,भोसरी २६
जा.क्र.कप्र/९/कावि/४४५/२००९
दिनांकः- २०/११/२००९

प्रति,

..................................
सदस्य/सदस्या
क प्रभाग समिती

विषयः-पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासीक सभा क्र.९ बुधवार दिनांक २/१२/२००९ रोजी दु.१२.०० वाजता आयोजीत केलेबाबत.

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक २/१२/२००९ रोजी दु.१२.०० वाजता क प्रभाग कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजीत केली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका क्र.९ जोडली आहे.सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
प्रशासन अधिकारी
तथा
सचिव (सभाशाखा)
क प्रभाग समिती

सोबतः- दि.२/१२/०९ रोजीच्या सभेची कार्यक्रमपत्रिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग कार्यालय,भोसरी २६
कार्यक्रमपत्रिका क्र.९

दिनांक.२/१२/२००९ वेळ.दुपारी १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासीक सभा दिनांक २/१२/२००९ रोजी दुपारी १२.०० वाजता क प्रभाग कार्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजीत करण्यात आली आहे.सदर सभेमध्ये खालील विषय चर्चेसाठी व मंजूरीसाठी ठेवणेत आलेले आहेत

विषय क्र.१ मागील दि.४/११/२००९ च्या सभेचा सभावृत्तांत ठराव क्र.१२८८ विषय क्र.८ वगळून कायम करणे.

विषय क्र.२ पिंपरी चिंचवड महानगरपालिका फेरीवाला व्यवसायाचे (विनियमन) आदर्श उपविधी २००९ अंतर्गत हॉकर्स झोन बाबत मान्यता देणेबाबत विचार करणे
(दि.२.१२.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.३ पिंपरी चिंचवड क प्रभाग आरोग्य विभागाचे सन २००९ -१० या आर्थिक वर्षाचे अर्थसंकल्पात हॉटेल वेस्ट या लेखाशिर्षावर र.रुपये ४,००,०००/- तरतूद करणेत आलेली आहे.सदर तरतूदीमधून आजअखेर रक्कम रुपये ३,२८,४४०/- एवढा खर्च झाला असून शिल्लक रक्कम रुपये ७१,५६०/- एवढी आहे.

उपलब्ध असलेली तरतूद कामकाज पहाता भविष्यात अपुरी पडणार असून दैनंदिन कामकाजात व्यत्यय निर्माण होवू शकतो.

सबब हॉटेल वेस्ट या लेखाशिर्षावर रक्कम रुपये २,००,०००/- एवढी तरतूद वर्ग होणे आवश्यक आहे.सदरची रक्कम हॉकी मैदान लांडगे कुस्ती प्रशिक्षण केंद्र बॅडमिंटन या लेखाशिर्षातून वर्ग करता येणे शक्य आहे.

तरी सदरची तरतूद वर्ग करणेकामी मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.२.१२.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.४ मा.अध्यक्षा यांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय

सही/-
प्रशासन अधिकारी
तथा
सचिव (सभाशाखा)
क प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८,क प्रभाग कार्यालय
जा.क्र.कप्रस/९/कावि/४४५/२००९
दिनांक:- २० / ११ /२००९